# <u>राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालाच्या विद्यार्थ्यांचे पदवी परीक्षेत सुयश</u>

आंबव येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या अभियांत्रिकी पदवीच्या अंतिम परीक्षेत सुयश प्राप्त केले आहे. यामुळे महाविद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम राहिली आहे.

ऑटोमोबाईल विभागाचा सुरज यादव याने ८.७३ पॉइंट मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. तर संदीप प्रजापती व समिधा तानवडे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. या शाखेचा निकाल ९३.३३ टक्के इतका लागला.

माहिती व तंत्रज्ञान शाखेचा निकाल ९३.३३ टक्के असून सुधांशू भोसले हा ७.७४ पॉइंटसह महाविद्यालयात प्रथम आला आहे. या शाखेतील रणजीत जोशी व स्मिता चव्हाण यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महाविद्यालयाच्या संगणक विभागाचा एकूण निकाल ९३.२२ टक्के लागला असून त्यामध्ये नमिता पराडकर हिने ८.९२ पॉइंटसह प्रथम येण्याचा मान मिळवला. भक्ती सोहोनी व बाबु पवार या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे द्वितीय व त्रितीय क्रमांक प्राप्त केले.

मेकॅनिकल विभामध्ये अक्षय वारंग याने ९.०६ पॉइंटसह प्रथम क्रमांक पटकाविला आहे. तर राहुल झोरे व हर्षाली माकडे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकविला आहे. या शाखेचा एकत्रित निकाल ८३ टक्के आहे.

अणूविद्युत व दूरसंचार विभागाला एकत्रित निकाल ९०.९१ टक्के इतका लागला असून त्यामध्ये पूजा धुमाळे ९.०१ पॉइंटसह प्रथम तर सुस्मिता कदम व फैज खान या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले.

महाविद्यालयाच्या सर्व शाखांमधून २८६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील ४५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर ९२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. संस्थाध्यक्ष मा. श्री. रवींद्र माने, कार्याध्यक्ष सौ. नेहा माने, जान्हवी माने, उपाध्यक्ष श्री. मनोहर सुर्वे, सचिव श्री. चंद्रकांत यादव, सहसचिव श्री. दिलीप जाधव, प्राचार्य डॉ. महेश भागवत, परीक्षा विभागप्रमुख प्रा. विश्वनाथ जोशी व प्राध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.